-: प्रेसनोट :-

दि. २८/०७/२०२१

**तक्रारदार याना दाखल गुन्हामध्ये मदत करण्यासाठी आरोपी क्र. १ याने २ कोटी रुपये ची लाचेची मागणी करुन तडजोडी अती १ कोटी ५० लाख रुपयाची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने तसेच सदर रकमेपैकी आरोपी क्र.२ याने रु १० लाख लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा नोंद.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | **मुंबई विभाग** |
| गुन्हा नोंद क्रमांक | ला.प्र.वि. मुंबई विभाग पडताळणी क्र. ६१/२०२१<br>सेलू पोलिस स्टेशन जि.परभणी गुन्हा रजि.नं. २३३/२०२१ |
| कलम | ७ भ्र.प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपीतांचे नाव व कार्यालय | १) गजेंद्र रामकरण पाल वय ५५ वर्षे,उपविभागीय पोलिस अधिकारी,सेलू विभाग,जि.परभणी<br>२) गणेश लक्ष्मणराव चव्हाण वय ३७ वर्षे,पोलिस नाईक/११२१,नेमणूक मानवत पोलिस स्टेशन,जि.परभणी संलग्न उपविभागीय पोलिस अधिकारी,सेलू विभाग,जि.परभणी |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. २ कोटी रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. १० लाख रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे मित्राचा अपघाती मृत्यु झालेबाबत दिनांक ०३/०५/२०२१ रोजी सेलू पोलिस ठाणे जि.परभणी येथे गुन्हा रजि क्रमांक १२०/२०२१ भादंवि कलम ३०४(अ),२७९,४२७ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्हयातील मयत याचे पत्नी सोबत यातील तक्रारदार यांचे झालेले मोबाईल वरील संभाषण व्हायरल झाल्याने दिनांक ९/०७/२०२१ रोजी यातील आरोपीत क्र.१ यानी तक्रारदार याना त्याचे कार्यालयात बोलावुन, ' तुझी व्हायरल झालेली क्लीप मी ऐकली असुन यातुन तुला बाहेर पडायचे असेल तर मला २ कोटी रुपये दयावे लागतील ' असे बोलुन तक्रारदार याना वारवार फोन करुन अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करुन २ कोटी रुपये लाचेची मागणी केली.<br>तक्रारदारास आरोपीत लोकसेवकास लाच दयावयाची नसल्याने त्यानी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे दि. २२/०७/२०२१ रोजी प्रत्यक्ष येवुन लेखी तक्रार दिली.मा.वरिष्ठाचे आदेशाने सदर तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी **लाचलुचपत प्रतिबंध विभाग,मुंबई** यास निर्देश देण्यात आले.<br>त्यानुसार दि.२३/०७/२०२१ रोजी तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन पडताळणी केली असता, यातील आरोपी लोकसेवक क्र. १ याने तक्रारदार यांचेकडे वर नमुद गुन्हयात मदत करण्यासाठी २ कोटी रु.ची मागणी करुन तडजोडी अंती १ कोटी ५० लाख रुपये इतक्या रक्कमेची लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले.<br>त्यानंतर काही वेळातच केलेल्या सापळा कारवाई दरम्यान आरोपीत लोकसेवक क्र. २ यास तक्रारदार यांचे भावाकडून १० लाख रुपये लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे. |

( आबासाहेब पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकाना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ–acbmaharastra.gov.in
ईमेल - १) acbwebmail@mahapolice.gov.in
२) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज–www.acbmaharastra.net.टोलफ्रि क्र. १०६४
दुरध्वनीक्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००